## अंकिता नाटकर विरुध्द गजानन नाटकर व ईतर

## आदेश निशाणी क्र.१८

अर्जदाराने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २००५ चे कलम २३ नुसार प्रस्तुतचा अर्ज मुळ दाखल केल्या तारखेपासुन अर्जदाराला गैरअर्जदारांकडुन बारा हजार रुपये अंतरिम पोटगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

०२. अर्जदाराचे असे कथन आहे की, अर्जदार हिच्या विवाह गैरअर्जदार क्र.१ सोबत दिनांक ३०.१०.२०२२ रोजी माले टाकळी ता. सेलु जि. परभणी येथे मोठ्या थाटामाटात पार पाडला. लग्नांनतर अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ यांच्या गावी मौजे लिंबी तालुका घनसावंगी जि. जालना येथे नांदावयास गेली असता गैरअर्जदारांनी अर्जदारास सुरुवातीचेएक ते दोन महिने कसे बसे चांगले नांदवले व त्यानंतर क्षुल्लक कारणावरुन त्रास देण्यास सुरुवात केली. गैरअर्जदार हे अर्जदाराला नेहमी म्हणायचे की, तु दिसायला काळी आहेस, तुला भांडी नीट धुवायला येत नाहीत असे म्हणुन अपमानीत करायचे व अर्जदार क्र. २ ते ५ हे गैरअर्जदार क्र. १ ला लावुन देऊन अर्जदारास मारहाण व शिवीगाळ करायला लावायचे. तसेच गैरअर्जदारांनी अर्जदाराकडे घरावर छत टाकायचे आहे व त्यासाठी तुझ्या वडीलांकडुन एक लाख रुपये घेऊन ये अशी मागणी केली. अर्जदाराने तिच्या आई–वडीलांची आर्थीक परिस्थीती हलाखीची असल्याचे गैरअर्जदारांना सांगीतल्यावर त्यांना राग आला व गैरअर्जदार क्र. ३ हिने अर्जदाराच्या केसाला धरुन ओढले, गैरअर्जदार क्र. २ हे गैरअर्जदार क्र. १ यास म्हणाले की, ही अवदसा कशाला घरात आणलीस, हिला आत्ताच खतम करुन टाक. त्यावर गैरअर्जदार क्र. १ व ३ यांनी अर्जदाराच्या हातात जबरदस्तीने लायटींगचे वायर अंगावर टाकुन विजेचा शॉक देऊन जिवे मारण्याचा प्रयत्न केला. सदरची घटना तिने तिच्या वडीलांना सांगीतली असता त्यांनी गैरअर्जदारांना समजावुन सांगण्याचा प्रयत्न केला असता गैरअर्जदारांनी तिला काही दिवस चांगले नांदवले व त्यानंतर परत त्रास देण्यास सुरुवात केली.

०३. अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, दिनांक १३.०७.२०२३ रोजी परत

गैरअर्जदारांनी अर्जदाराकडे घराव स्लॅब टाकण्यासाठी एक लाख रुपयाची मागणी करुन तिला शिवीगाळ करुन घरातुन हाकलुन दिले व पैसे घेऊन आलीस तरच तुला नांदवतो असे म्हणुन हाकलुन लावले. तेंव्हापासुन अर्जदार ही तिच्या आई–वडीलांकडे तिचे माहेरी मौजे मालेटाकळी ता. सेलु जि. परभणी येथे राहते.

०४. अर्जदाराचे पुढे असेही कथन आहे की, अर्जदार हिस गैरअर्जदाराने दिलेल्या शारीरीक व मानसिक त्रासामुळे व केलेल्या मारहाणीमुळे तिचे शरीर क्षीण झाले असुन तिला कोणताही कामधंदा होत नाही तसेच गैरअर्जदाराने कुठल्याही प्रकारे आर्थीक मदत केलेली नाही. त्यामुळे अर्जदारावर उपासमारीची वेळ येत नाही व दैनंदिन जीवनावश्यक गरजा भागवणे अत्यंत कठीण होत आहे. त्यामुळे अर्जदार हिस जीवनावश्यक गरजा भागवणे करीता व उदरनिर्वाह करण्यासाठी व वाढती महागाई बघता प्रतिमहा बारा हजार एवढील अंतरिम पोटगी गैरअर्जदाराकडुन मिळणे अत्यंत आवश्यक आहे. याउलट गैरअर्जदार क्र. १ हा छत्रपती संभाजी नगर येथे एका नामांकित कंपनीमध्ये कामाला असुन त्यास रुपये पंचेवीस हजार एवढा प्रतिमहा पगार आहे. त्याचबरोबर गैरअर्जदार क्र. २ हा जमीन खरेदी विक्रीचा व्यवहार करतो त्यातुन तो वार्षीक पाच ते सात लाख रुपये एवढे कमावतो तर गैरअर्जदार क्र. ३ ही आशा वर्कर असुन तिला प्रति महिना पंधरा हजार रुपये एवढे मानधन मिळते, त्यामुळे गैरअर्जदार हे सधन असुन अर्जदार हिस प्रतिमहा बारा हजार रुपये एवढी अंतरिम पोटगी देऊ शकतात. सबब, अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज मंजुर होण्याची विनंती केली आहे.

०५. गैरअर्जदारांना नोटीस बजावली. गैरअर्जदार यांच्या वतीने सुविद्य विधीज्ञ श्री. जि.बी.बोकन यांनी सदरच्या अर्जावर म्हणणे दाखल केले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, अर्जातील मजकुर निखालस खोटा आहे. परंतु गैरअर्जदारांनी अर्जदारासोबतचे नातेसंबंध मान्य केले आहेत. तसेच त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, गैरअर्जदारांनी कधीही अर्जदारासोबत भांडण केले नाहीत किंवा तिच्याकडे कधीधी पैशाची मागणी केली नाही. अर्जदारास लिंबी हे खेडेगांव असल्यामुळे सासरी राहणे आवडत नव्हते. त्यामुळे ती गैरअर्जदाराकडे सतत तिला माहेरी सोडण्याबाबत तगादा लावीत असत व त्याच्यासोबत भांडण करुन जिवाचे बरे वाईट करुन घेईल अशी धमकी देत असत. गैरअर्जदाराचे पुढे असे

म्हणणे आहे की, गैरअर्जदार हा मोलमजुरी करुन उदरनिर्वाह चालवतो त्यामुळे तो स्वत: त्याच्या आई–वडीलांच्या घरी राहतो. अर्जदार ही स्वत:हुन तिच्या आई–वडीलांच्या घरी राहण्यासाठी गेलेली आहे. गैरअर्जदारांनी तिला कधीही हाकलुन दिले नाही. गैरअर्जदाराचे पुढे असे म्हणणे आहे की, अर्जदार ही स्वत: शिवणकाम व मजुरीचे काम करुन तिचा स्वत:चा निर्वाह चालु शकते. तसेच गैरअर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. २ ते ५ हे मजुरीचे काम करीत असल्यामुळे त्यांची परिस्थीती हलाखीची असल्यामुळे ते अर्जदाराला पोटगी देण्यास असमर्थ आहेत. त्यामुळे गैरअर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज नामंजूर होण्याबाबत विनंती केली आहे.

**०६.** अर्जदार व गैरअर्जदार यांच्या परस्परविरोधी कथनांवरुन खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात. त्या प्रत्येक मुद्दयांचा निष्कर्ष मी त्या खाली दिलेल्या कारणांकरिता मांडत आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१. | अर्जदारावर घरगुती हिंसाचार झाला हे सकृत दर्शनी सिध्द होते काय? | .....होकारार्थी. |
| ०२. | अर्जदारावर ची गैरअर्जदारांनी सबळ कारणाशिवाय उपेक्षा केली असे सकृत दर्शनी सिध्द होते काय? | .....होकारार्थी. |
| ०३. | अर्जदार गैरअर्जदाराकडून मागणी केल्याप्रमाणे अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय? | .... अंशतः होकारार्थी. |
| ०४. | आदेश काय ? | ....अंतिम आदेशाप्रमाणे. |

**कारणमिमांसाः**

**मुद्दा क्र.१ करिताः–**

**०७.** अर्जदाराच्या वतीने सुविद्य विधीज्ञ श्री. एम.बी.गजमल यांनी अर्जातील कथनानुसार युक्तीवाद केला व अर्जदाराला तिने मागणी केल्याप्रमाणे अंतरिम पोटगी मंजूर करण्याबाबत न्यायालयाला विनंती केली. तसेच, गैरअर्जदाराच्या वतीने श्री. जि.व्ही.बोकन

यांनी युक्तीवाद केला व अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

०८. गैरअर्जदारांनी मुख्य अर्जाला त्यांचे लेखी म्हणणे निशाणी क्र.१६ नुसार दाखल केले आहे. त्यामध्ये गैरअर्जदाराने असे मान्य केले आहे की, लग्नानंतर अर्जदार त्याच्याकडे राहिली. यावरुन अर्जदार व गैरअर्जदार क्र १ यांचे वैवाहीक संबंध असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते. गैरअर्जदारांने त्यांच्या उत्तरामध्ये त्यांच्या विरुध्द लावलेल्या सर्व आरोपांचे खंडण केले आहे. अर्जदाराने तिच्या अर्जामध्ये सुध्दा तिच्यावर झालेल्या हिंसाचार घटनाक्रमाने नमुद केला आहे. यावरुन अर्जदारावर गैरअर्जदारांकडुन घरगुती हिंसाचार झाला ही बाब प्रथमदर्शनी सिध्द होते.

०९. अर्जदार व गैरअर्जदारांनी एकमेकांविरूध्द आरोप प्रत्यारोप केल्याचे दिसुन येते. कोणतीही विवाहीत स्त्री ही सबळ कारणाशिवाय तिच्या पतीला सोडुन माहेरी राहत नाही. गैरअर्जदाराकडुन त्यांच्यावर लावण्यात आलेल्या आरोपांचे जरी खंडण करण्यात आले असले तरीही अर्जदाराच्या कथनावर अविश्वास ठेवावा हे सद्सदविवेक बुध्दीला न पटण्यासारखे आहे. अर्जदाराने केलेल्या संपुर्ण कथनांचा एकत्रीत विचार करता गैरअर्जदारांकडुन तिच्यावर घरगुती हिंसाचार झाला ही बाब प्रथमदर्शनी दिसुन येते. सबब, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवितो.

## मुद्दा क्र.२ व ३ करीता:-

१०. प्रस्तुतच्या अर्जान्वये अर्जदाराने तिच्या उपजिवीकेकरीता रु.१२,०००/- प्रतिमाह अंतरीम पोटगी मिळण्याचे नमुद केले आहे. अर्जदाराच्या कथनानुसार ती तिच्या माहेरी राहत आहे व गैरअर्जदाराने तिच्या पालनपोषनाची कोणतीही व्यवस्था करुन ठेवली नाही.

११. अर्जदाराच्या कथनानुसार गैरअर्जदार क्र. १ हा छत्रपती संभाजी नगर येथे एका नामांकित कंपनीमध्ये कामाला असुन त्यास रुपये पंचेवीस हजार एवढा प्रतिमहा पगार आहे. त्याचबरोबर गैरअर्जदार क्र. २ हा जमीन खरेदी विक्रीचा व्यवहार करतो त्यातुन तो वार्षीक पाच ते सात लाख रुपये एवढे कमावतो तर गैरअर्जदार क्र. ३ ही आशा वर्कर असुन तिला प्रति महिना पंधरा हजार रुपये एवढे मानधन मिळते त्यामुळे गैरअर्जदार हे सधन

असुन अर्जदार हिस प्रतिमहा बारा हजार रुपये एवढी अंतरिम पोटगी देऊ शकतात. अर्जदाराने तिच्या कथनाच्या पुष्ठर्थ तिने पो.नि. महिला तक्रार निवारण मंच,सेलु यांच्याकडे दिलेल्या तक्रारीची प्रत, तिचे व गैरअर्जदार क्र. १ च्या लग्नाची पत्रीकेची छायांकित प्रत, लग्नाचा फोटो व संरक्षण अधिकारी, अभय केंद्र, सेलु यांच्याकडे दिलेल्या अर्जाची प्रत दाखल केली आहे. परंतु अर्जदाराने गैरअर्जदार क्र. १ च्या उत्पन्नाबाबत देखील कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. गैरअर्जदारांनी त्यांच्या उत्तरामध्ये असे कथन केले आहे की, गैरअर्जदारांनी अर्जदाराचा शारीरीक व मानसिक छळ केला नाही तसेच तिच्याकडे पैशाची मागणी केली नाही व तिला उपाशी पोटी ठेवुन मारहाण केली नाही. तसेच अर्जदाराने प्रस्तुत अर्जात नमुद केल्याप्रमाणे गैरअर्जदारांला त्याप्रमाणे उत्पन्न मिळत नसुन अर्जदाराने काल्पनिकरित्या ते नमुद केले आहे. त्यामुळे अर्जदाराच्या मागणीप्रमाणे पोटगी मंजुर करता येणार नाही.

**१२.** गैरअर्जदार क्र. १ यांनी त्याच्या म्हणण्यामध्ये तो स्वत: मजुरीचे काम करतो असे कथन केले आहे. गैरअर्जदारांनी केलेले सदरचे कथन खरे असल्याचे जरी गृहीत धरले तरीही अर्जदाराला सांभाळण्याची संपुर्ण जबाबदारी गैरअर्जदारांवर आहे. अर्जदाराने प्रस्तुतचे प्रकरण हे संरक्षण अधिकारी मार्फत दाखल केल्याने अंतरिम पोटगीचा अर्जाचा निर्णय घेत असतांना प्रथमदर्शनी अर्जदारावर घरगुती हिंसाचार झाला हे अभिलेखावरुन दिसुन येणे गरजेचे आहे. गैरअर्जदारांनी असे कुठेही कथन केले नाही की, त्यांनी अर्जदाराच्या पालन पोषणाची व्यवस्था केली आहे किंवा अर्जदार ही स्वत: तिच्या पालन पोषणाची जबाबदारी स्वीकारू शकते किंवा तिच्याकडे उत्पन्नाचे साधन आहे. अशा परिस्थितीत अर्जदाराला अंतरीम पोटगी देण्याचे दायीत्व हे गैरअर्जदारांवर आहे.

**१३.** दोन्ही बाजुकडील त्यांच्या राहणीमानाचा दर्जा व आजच्या महागाईचा विचार करता मी या निष्कर्षावर पोहोचतो की, गैरअर्जदाराने त्याचे मालमत्ता व दायीत्वचे कागदपत्र अभिलेखावर दाखल केलेले नाहीत. त्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या **रजनेश विरुध्द नेहा** मधील न्यायनिर्णयाप्रमाणे गैरअर्जदाराचे उत्पन्नाचे स्त्रोत हे अर्जदाराच्या कथनाप्रमाणे बरोबर असल्याचे ग्राह्य धरुन अर्जदाराला रक्कम रुपये २,०००/– (अक्षरी दोन हजार रुपये)

अंतरीम पोटगी मंजुर केल्यास ती योग्य व न्याय्य होईल. तसेच गैरअर्जदारांवर सुध्दा अन्यायकारक होणार नाही. सबब, मी मुद्दा क्र. २ चे उत्तर होकारार्थी व मुद्दा क्र. ३ चे उत्तर अंशत: होकारार्थी नोंदवितो व मुद्दा क्र.४ च्या उत्तरादाखल खालील प्रमाणे आदेश पारीत करतो.

## आदेश

**०१.** अर्जदाराचा अर्ज (नि.क्र.१८) अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

**०२.** गैरअर्जदारा क्र. १ ला निर्देश देण्यात येते की त्यांनी, अर्जदाराला प्रतिमाह रुपये २,०००/– (अक्षरी दोन हजार रुपये) अंतरिम पोटगी म्हणून मुळ अर्ज दाखल तारखेपासून मुळ अर्ज अंतिम निकाली निघेपर्यन्त द्यावी.

**०३.** गैरअर्जदारांना असेही निर्देश देण्यात येते की, त्यांनी अर्जदाराला अर्जाच्या खर्चापोटी ५००/– (अक्षरी पाचशे फक्त) द्यावेत.

**०४.** या आदेशाची प्रत अर्जदार व गैरअर्जदार यांना निःशुल्क देण्यात यावी.

**०५.** उभय पक्षकारांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

GAURAV ANANTRAO TARAL
Digitally signed by GAURAV ANANTRAO TARAL
Date: 2026.03.11 16:25:30 +0530

दिनांकः– ११.०३.२०२६

**(जि.ए.तराळ)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
सेलू, जि. परभणी.